जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 DEC 2021
लोकमत

# विद्यापीठ घेणार राज्याच्या आर्थिक वाटचालीचा वेध

## कोल्हापूर, सिंधुदुर्गसह सहा जिल्ह्यांचा समावेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शासनाच्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयातर्फे शिवाजी विद्यापीठास सांख्यिकी सक्षमीकरणासाठी साहाय्य व केंद्र योजनेंतर्गत जिल्हा स्तरावर 'जिल्हा उत्पन्न अंदाज' तयार करण्याचा सुमारे ८५ लाख रुपयांचा पथदर्शी प्रकल्प मंजूर झाला आहे. करारान्वये राज्यासाठी जिल्हा स्तरावर 'जिल्हा उत्पन्न अंदाज' करण्याच्या कार्यपद्धतीत सुधारणा करण्यासाठी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र व संख्याशास्त्र अधिविभागातील तज्ज्ञांनी शासनास प्रस्ताव सादर केला होता. त्याला नियोजन विभागाने मान्यता दिली.

अंदाज तयार करण्याची कार्यपद्धती विकसित करणे, त्यानुसार प्रथम पुणे विभागातील एका जिल्ह्यासाठी म्हणजेच कोल्हापूर जिल्ह्याकरिता जिल्हा उत्पन्न अंदाज तयार करणे आणि त्यानंतर इतर महसुली विभागातील प्रत्येकी एक याप्रमाणे पाच जिल्ह्यांचे जिल्हा उत्पन्न अंदाज तयार करणे या कामांचा समावेश आहे.

या पाच जिल्ह्यांमध्ये सिंधुदुर्ग, नंदुरबार, उस्मानाबाद, यवतमाळ, नागपूरचा समावेश आहे. या पथदर्शी प्रकल्पानंतर पुढील टप्प्यात राज्यातील इतर सर्व जिल्ह्यांना जिल्हा उत्पन्न अंदाज तयार करण्यासाठी मार्गदर्शन, साहाय्य करण्यात येणार आहे. विद्यापीठाने अर्थशास्त्र व संख्याशास्त्र अधिविभागातील तज्ज्ञांची समिती तयार केली असून, प्रकल्पाचा आराखडा तयार करण्याचे काम सुरू झाले आहे.

### पथदर्शी प्रकल्प

सकल राष्ट्रीय उत्पन्नावरून देशाच्या आर्थिक स्थितीचा आणि वाटचालीचा अंदाज घेतला जातो. याच्या आधारे देशाची विविध आर्थिक धोरणे आखली जातात. राज्यस्तरावर मात्र अशी स्वतंत्र व्यवस्था नाही. त्यामुळे राज्याच्या आर्थिक वाटचालीचा वस्तुनिष्ठ वेध घेता येत नाही. ते लक्षात घेऊन हा पथदर्शी प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.



जिल्हानिहाय जिल्हा उत्पन्न अंदाज पद्धती विकसित करण्याचा हा देशातील पहिलाच पथदर्शी प्रयोग आणि प्रकल्प आहे. त्यामुळे सूक्ष्म स्तरावर देशाच्या आर्थिक उत्पन्नाचा अंदाज अधिक नेमकेपणाने घेता येणार आहे. पुढे हा प्रकल्प राज्यभरात राबविला जाणार आहे.

**-डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरू

लोकमत

# २३ महाविद्यालयांची बिंदुनामावली तपासणी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विशेष कक्षातर्फे जिल्ह्यातील महाविद्यालयांसाठी बिंदुनामावली तपासणी शिबिर गुरुवारी न्यू कॉलेज येथे घेण्यात आले. त्यात सहभागी झालेल्या २९ पैकी २३ महाविद्यालयांची तपासणी पूर्ण झाली. राज्य शासनाच्या दि. १२ नोव्हेंबर २०२१ च्या निर्णयानुसार विद्यापीठाच्या विशेष कक्षातर्फे कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील महाविद्यालयांसाठी बिंदुनामावली तपासणीचे विशेष शिबिर आयोजित केले होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 DEC 2021
पुढारी

# विद्यापीठास ८५ लाखांचा प्रकल्प मंजूर

## 'जिल्हा उत्पन्न अंदाज'चा देशातील पहिलाच प्रकल्प

### अर्थ व सांख्यिकी तज्ज्ञांचा समावेश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र शासनाच्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत शिवाजी विद्यापीठास सांख्यिकी सक्षमीकरणासाठी सहाय्य व केंद्र योजनेअंतर्गत जिल्हा स्तरावर 'जिल्हा उत्पन्न अंदाज' तयार करण्याचा ८५ लाख रुपयांचा पथदर्शी प्रकल्प मंजूर झाला आहे. हा देशातील पहिलाच प्रकल्प असणार आहे.

अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या 'सांख्यिकी सक्षमीकरणासाठी सहाय्य' या केंद्र योजनेंतर्गत मंजूर सामंजस्य करारान्वये राज्यासाठी जिल्हा स्तरावर 'जिल्हा उत्पन्न अंदाज' करण्याच्या कार्यपद्धतीत सुधारणा करण्यासाठी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र व संख्याशास्त्र अधिविभागातील तज्ज्ञांच्या द्वारे शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्या प्रस्तावास शासनाच्या नियोजन

### विद्यापीठातील तज्ज्ञांची समिती स्थापन

पथदर्शी प्रकल्पानंतर पुढील टप्प्यात राज्यातील इतर सर्व जिल्ह्यांना जिल्हा उत्पन्न अंदाज तयार करण्यासाठी मार्गदर्शन व सहाय्य केले जाणार आहे. प्रकल्पासाठी शासनाने ८५ लाख १४ हजार रुपयांच्या खर्चास मान्यता दिली आहे. विद्यापीठाने अर्थशास्त्र व संख्याशास्त्र अधिविभागातील तज्ज्ञांची समिती तयार केली असून प्रकल्पाचा आराखडा तयार करण्याचे काम सुरू केले आहे.



विभागाकडून नुकतीच मान्यता मिळाली आहे. जिल्हा उत्पन्न अंदाज तयार करण्याची कार्यपद्धत विकसित करणे, त्यानुसार प्रथम पुणे विभागातील कोल्हापूर जिल्ह्याकरिता जिल्हा उत्पन्न अंदाज तयार करणे व त्यानंतर इतर महसुली विभागातील प्रत्येकी एक याप्रमाणे पाच जिल्ह्यांचे जिल्हा उत्पन्न अंदाज तयार करण्यात येणार आहे. सिंधुदुर्ग, नंदूरबार, उस्मानाबाद, यवतमाळ व नागपूर या जिल्ह्यांचा समावेश आहे.

राष्ट्रीय स्तरावर सकल राष्ट्रीय उत्पन्न मोजले जाते. त्यावरून देशाच्या आर्थिक स्थिती आणि वाटचालीचा अंदाज घेतला जातो. याच्या आधारे देशाची विविध आर्थिक धोरणे आखली जातात. राज्य स्तरावर मात्र अशी स्वतंत्र व्यवस्था नाही. त्यामुळे राज्याच्या आर्थिक वाटचालीचा वस्तुनिष्ठ वेध घेता येत नाही. ही बाब लक्षात घेऊन राज्याच्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयाने पथदर्शी प्रकल्प हाती घेतला आहे. यात कृषी, वाणिज्य, व्यापार, उद्योग, सहकार, सेवा आदी सर्वच क्षेत्रांचा समावेश असल्याने जिल्ह्याचे नेमके उत्पन्न प्रथमच समोर येणार आहे. या अधिक नेमक्या सांख्यिकीय माहितीच्या आधारे राज्य शासनाला आर्थिक धोरणे काटेकोरपणे आखण्यास मदत होणार आहे. विद्यापीठातील अर्थ व सांख्यिकी तज्ज्ञांकडून प्रकल्पाला दिशा मिळणार आहे.

> “ जिल्हानिहाय जिल्हा उत्पन्न अंदाज पद्धत विकसित करण्याचा पहिलाच पथदर्शी प्रयोग आहे. यामुळे सूक्ष्म स्तरावर देशाच्या आर्थिक उत्पन्नाचा अंदाज नेमकेपणाने घेता येणार आहे. पथदर्शी प्रकल्प पुढे राज्यभर राबविला जाणार आहे. पुढे राष्ट्रीय स्तरावरही विस्ताराची क्षमता यात आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाचे देशाच्या आर्थिक विकासाची धोरणे ठरविण्यासाठी मोलाचे योगदान लाभणार आहे.
>
> - डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

11 DEC 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'जिल्हा उत्पन्न अंदाज' तयार करण्याचा ८५ लाखांचा प्रकल्प

## शिवाजी विद्यापीठात देशातील पहिलाच पथदर्शी प्रयोग मंजूर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत शिवाजी विद्यापीठास सांख्यिकी सक्षमीकरणासाठी साहाय्य व केंद्र योजनेंतर्गत जिल्हास्तरावर 'जिल्हा उत्पन्न अंदाज' तयार करण्याचा सुमारे ८५ लाख रुपयांचा पथदर्शी प्रकल्प मंजूर केला आहे. हा देशातील पहिलाच प्रकल्प असल्याची माहिती अर्थशास्त्र विभागामार्फत देण्यात आली.



अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या 'सांख्यिकी सक्षमीकरणासाठी साहाय्य' या केंद्र योजनेंतर्गत मंजूर सामंजस्य करारान्वये जिल्हास्तरावर 'जिल्हा उत्पन्न अंदाज' करण्याच्या कार्यपद्धतीत सुधारणा करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र व संख्याशास्त्र अधिविभागाने प्रस्ताव सादर केला होता. त्यास शासनाच्या नियोजन विभागाकडून नुकतीच मान्यता मिळाली. त्यानुसार जिल्हा उत्पन्न अंदाज तयार करण्याची कार्यपद्धती विकसित करणे. प्रथम पुणे विभागातील एका जिल्ह्यासाठीचा म्हणजेच कोल्हापूरसाठी उत्पन्न अंदाज तयार करणे. त्यानंतर इतर महसुली विभागातील प्रत्येकी एक याप्रमाणे पाच जिल्ह्यांचे अंदाज तयार करणे या कामांचा समावेश आहे. यामध्ये सिंधुदुर्ग, नंदुरबार, उस्मानाबाद, यवतमाळ व नागपूर यांचा समावेश आहे. या प्रकल्पासाठी शासनाने ८५ लाख १४ हजार रुपयांच्या अंदाजित खर्चास मान्यता दिली आहे.

### प्रकल्पाचे महत्त्व

राष्ट्रीय स्तरावर सकल राष्ट्रीय उत्पन्न मोजले जाते. त्यावरून देशाच्या आर्थिक स्थितीचा, वाटचालीचा अंदाज घेतला जातो. त्याआधारे आर्थिक धोरणे आखली जातात; मात्र राज्यस्तरावर ही स्वतंत्र व्यवस्था नाही. ही बाब लक्षात घेऊन हा पथदर्शी प्रकल्प हाती घेतला आहे. यामध्ये कृषी, वाणिज्य, व्यापार, उद्योग, सहकार, सेवा आदी सर्वच क्षेत्रांचा समावेश असल्याने जिल्ह्याचे नेमके उत्पन्न प्रथमच सामोरे येणार आहे.

### 'शिवाजी विद्यापीठाचे योगदान'



जिल्हा उत्पन्न अंदाज पद्धती विकसित करण्याचा हा देशातील पहिलाच पथदर्शी प्रयोग व प्रकल्प आहे. यामुळे सूक्ष्म स्तरावर देशाच्या आर्थिक उत्पन्नाचा अंदाज अधिक नेमकेपणाने घेता येणे शक्य होणार आहे. या प्रकल्पानंतर पुढे हा प्रकल्प राज्यभरात राबविला जाणार आहे. पुढे राष्ट्रीय स्तरावरही विस्ताराची क्षमता या प्रकल्पामध्ये आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाचे मोलाचे योगदान असणार आहे.

**- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के**

पुण्यनगरी

# अध्ययन व्यवस्थापन विद्यार्थ्यांना लाभदायक : डॉ. महाजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

तंत्रज्ञानाचा वापर करून अध्ययन-अध्यापन व मूल्यमापन या शिक्षणाच्या प्रक्रियेमध्ये शिक्षक-विद्यार्थी संवाद आवश्यक ठरत आहे. विविध सुविधा अध्ययन व्यवस्थापन प्रणालीचा प्रभावी वापर विद्यार्थ्यांना लाभदायक ठरेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले.

वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'मूडल प्रणालीची उपयोगिता' या विषयावरील कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी संगणकशास्त्र विभागाच्या डॉ. ऊर्मिला पोळ, परशराम यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे सहायक प्रा. परशुराम वडार यांनी शिक्षकांशी संवाद साधला. डॉ. केदार मारुलकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. अर्चना मानकर यांनी आभार मानले. या कार्यशाळेदरम्यान डॉ. शिवाजी जाधव, डॉ. शशिकांत पंचगल्ले, डॉ. संतोष सुतार, डॉ. ए. एम. गुरव यांनी चर्चेत सहभाग घेतला.

पुण्यनगरी

# 'टीसीएस' मध्ये विद्यार्थ्यांची निवड

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांची टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस कंपनीमध्ये निवड झाली. या वर्षीही अधिविभागामधून कॉग्निझंट, कॅपजेमिनी, इन्फोसेस, ॲमडॉक्स, अशा अनेक नामवंत कंपन्यानी विद्यार्थ्यांची चांगले पॅकेज देऊन निवड केली आहे. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे आशुतोष शिरोले, स्वरूप भोसले, सिव्हिल इंजिनिअरिंगचे आशीष पटेल, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशनचे रोहन पाटील, सुशांत जाधव, ऋषीकेश गडख, वीरेन शहा, जानवी नांदवडेकर, ऋतुजा खोत, कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे कोमल पुरोहित, श्रेयस पाटील, ओमकार चौगुले, यश शृंगारे, तेजल अंबोलकर, शुभम मेथे, गौरव पाटील, शिविका ओझा, संजना विभूते, केमिकल इंजिनिअरिंग विभागामधून अंकेश चौगुले यांचा समावेश आहे.

पुण्यनगरी

# किरण गुरव यांना पीएच.डी.

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे अधीक्षक व साहित्यिक किरण गुरव यांना विद्यापीठाची पीएच.डी. जाहीर झाली. गुरव यांनी 'साहित्य निर्मिती प्रक्रियेचा मानसशास्त्रीय अभ्यास' या विषयावर मानव्यविद्या विद्याशाखेतून शोधप्रबंध सादर केला.

सकाळ

# गायकवाड यांच्या पुस्तकाचे आज प्रकाशन

**कोल्हापूर :** महावीर महाविद्यालयातील मराठीचे प्रा. डॉ. शरद गायकवाड यांच्या 'प्रबोधन चळवळीतील मातंगांची शौर्यगाथा' या ग्रंथाचे प्रकाशन शनिवारी (ता.११) होणार आहे. महाविद्यालयाच्या ॲम्फी थिएटरमध्ये सकाळी नऊला हा कार्यक्रम होईल. शिवाजी विद्यापीठाचे वाणिज्य विभागप्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन, मराठी विभागाचे प्रा. डॉ. नंदकुमार मोरे, प्रकाशक डॉ. श्यामसुंदर मिरजकर यांची प्रमुख उपस्थिती असेल. प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे अध्यक्षस्थानी असतील.

सकाळ

# शारदाबाई पवार अध्यासनातर्फे सोमवारपासून व्याख्यानमाला

## पाटील; स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रिया विषयावर व्याख्याने

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठातील श्रीमती शारदाबाई गोविंद पवार अध्यासनातर्फे 'भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रिया' या विषयावर व्याख्यानमालेचे आयोजन केले आहे. ही व्याख्यानमाला सोमवार (ता. १३) ते शनिवार (ता. १८) या कालावधीत दररोज सकाळी ११.३० वाजता ऑनलाईन होणार आहे. अशी माहिती अध्यासनाच्या समन्वयक प्रा. डॉ. भारती पाटील यांनी दिली आहे.

व्याख्यानमालेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सोमवारी (ता.१३) होणार आहे. पहिले पुष्प प्रसाद कुलकर्णी हे इंदूताई पाटणकर यांच्याविषयी व्याख्यान देऊन गुंफणार आहेत. त्यानंतर मंगळवारी (ता.१४) राजमती पाटील-बिरनाळे यांच्या विषयी प्रा. डॉ. पद्मजा पाटील बोलतील. बुधवारी (ता.१५) कॅप्टन लक्ष्मी सेहगल यांच्या योगदानाविषयी प्रा. डॉ. माया पंडित माहिती सांगतील.

गुरुवारी (ता. १६) डॉ. अशोक चौसाळकर हे डॉ. उषा मेहता यांच्याविषयी बोलतील. शुक्रवारी (ता. १७) ॲन मारी पीटरसन, इस्तर फाअरिंग, एलन होरुप यांच्या विषयी डॉ. नंदा पारेकर या व्याख्यान देतील. व्याख्यानमालेच्या शेवटच्या दिवशी शनिवारी (ता. १३) जयाबाई हाविरे आणि भागिरथी तांबट यांच्याविषयी प्रा. डॉ. छाया पवार मार्गदर्शन करतील.

सकाळ

# तंत्रज्ञान विभागातील विद्यार्थ्यांची 'टाटा कन्सल्टन्सी'त निवड

कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागातील ११ विद्यार्थ्यांची टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसमध्ये निवड झाली. या वर्षीच्या कॅम्पस मुलाखतीतून ही निवड झाली. अधिविभागातील विविध शाखांचा अभ्यासक्रम हा औद्योगिक कौशल्य, संशोधन आणि गुणवत्ता विकास आधारीत असल्याने अधिविभागातील विद्यार्थी राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये, देश-विदेशामध्ये उत्तम कामगिरी बजावत आहेत. शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण होण्याआधीच कामाची संधी उपलब्ध होते. या वर्षीही अधिविभागामधून कॉग्निझंट, कॅपजेमीनी, इन्फोसेस, ॲमडॉक्स अशा अनेक नामवंत कंपन्यांनी चांगले पॅकेज देऊन विद्यार्थ्यांची निवड केली. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. आर. के. कामत आणि ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलचे ऑफिसर डॉ. एस. बी. सादळे आदींचे मार्गदर्शन लाभत आहे. तसेच प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे प्रोत्साहन लाभले.

### निवड झालेले विद्यार्थी

- मेकॅनिकल इंजिनिअरिंग: आशुतोष शिरोले, स्वरूप भोसले.
- सिव्हिल इंजिनिअरिंग : आशिष पटेल.
- इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅन्ड टेलिकम्युनिकेशन : रोहन पाटील, सुशांत जाधव, ऋषिकेश गडख, वीरेन शहा, जानवी नांदवडेकर, ऋतुजा खोत.
- कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी : कोमल पुरोहित, श्रेयस पाटील, ओमकार चौगुले, यश शृंगारे, तेजल अंबोलकर, शुभम मेथे, गौरव पाटील, शिवीका ओझा, संजना विभुते.
- केमिकल इंजिनिअरिंग : अंकेश चौगुले

तरुण भारत

# नंदिनी, स्वाती, विश्रांती यांची राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड



इचलकरंजी : येथे शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतर विभागीय कुस्ती स्पर्धेत उद्घाटन प्रसंगी संभाजी वरुटे, पैलवान अमृतमामा भोसले, प्राचार्य डॉ प्रकाश पाटील, संभाजी पाटील, सुखदेव येरुडकर प्रा डॉ एवन आवळे.

**इचलकरंजी :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेस शुक्रवारी येथे सुरुवात झाली. मुलींच्या आज झालेल्या स्पर्धेत नंदिनी साळुंखे, स्वाती शिंदे, विश्रांती पाटील, अंजली पाटील यांच्यासह विविध गटातील मुलींची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली.

स्पर्धेचे उद्घाटन मास्को विजेते पैलवान संभाजी वरुटे, पैलवान अमृतमामा भोसले, प्राचार्य डॉ प्रकाश पाटील यांच्या हस्ते व जागतीक विजेते पैलवान संभाजी पाटील, सुखदेव येरुडकर प्रा डॉ एवन आवळे यांच्या उपस्थितीत झाली. जयवंतराव आवळे शिक्षण प्रशारक मंडळाच्या जयवंत महाविद्यालयातर्फे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेत कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यातील कॉलेजच्या मुले व मुलीनी सहभाग घेतला आहे. दोन दिवस या स्पर्धा चालणार आहेत. या मध्ये विविध वजन गटा मध्ये प्रथम येणय़ा कुस्ती खेळाडूंची निवड राष्ट्रीय स्पर्धेसाठी होणार आहे.

उद्घाटन कार्यक्रमानंतर आज मुलींच्या फ्रीस्टाईल कुस्ती स्पर्धेस सुरुवात झाली. या स्पर्धेतून विविध गटात राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या मुलींची नावे पुढील प्रमाणे : ५० किलो गट – नंदिनी बाजीराव साळुंखे (देवचंद कॉलेज अर्जुननगर) ५३ किलो – स्वाती संजय शिंदे (देवचंद अर्जुननगर) ५५ किलो– विश्रांती भगवान पाटील (दत्त कॉलेज वाकरे) ५७ किलो – अंजली आनंदराव पाटील (सदाशिवराव मंडलिक कॉलेज मुरगूड )५९ किलो– अंकिता आनंद शिंदे (सदाशिवराव मंडलिक कॉलेज मुरगूड) ६२ किलो– रूपाली भीमराव माने (शहाजी कॉलेज कोल्हापूर) ६५ किलो– वैष्णवी शिवाजी कदम (शिंदे महाविद्यालय तिसंगी) ६८ किलो– वेदांतिका अतुल पवार (वेणूताई चव्हाण कॉलेज कराड) ७२ किलो प्रतिक्षा रामदास बागडी (कस्तुरबा वालचंद कॉलेज सांगली) व ७७ किलो– ऋतुजा राजेंद्र संकपाळ डी आर माने महाविद्यालय कागल.

शनिवारी सकाळी आठ वाजल्यापासून मुलांच्या फ्रीस्टाईल मधील विविध वजनी गटातील कुस्ती स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. या स्पर्धा येथील व्यंकोबा मैदान या ठिकाणी सुरू आहेत.